दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शनिवार, 22 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 105 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# परळीत भुलईचा जल्लोष!

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी

परळी शहरात प्रथमच अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने महिलांसाठी 'भुलई' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला हजारो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पारंपरिक लोकसंस्कृतीचा अनुभव घेतला.

परळी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते भुलईची पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी वारकरी भजनी मंडळाच्या शहराध्यक्षा सौ. सुरेखाताई मेनकुदळे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि शाखाध्यक्षा मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गाणी, पारंपरिक खेळ, हास्य-विनोद आणि जुन्या आठवणींमधून महिलांनी मनमुराद आनंद लुटला. बदलत्या जीवनशैलीमुळे लोप पावत चाललेल्या या पारंपरिक लोककलेला पुन्हा उजाळा देण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.

'भुलई' म्हणजे केवळ खेळ नसून माहेरच्या आठवणी, स्नेह, आपुलकी आणि महिलांच्या भावविश्वाला जोडणारी समृद्ध लोकपरंपरा आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. हजारो महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने परळीत भुलईची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लोप पावत चाललेल्या परंपरेला नवा उजाळा**

**परळीत घुमली भुलईची गाणी हजारो महिलांनी दिला संस्कृती जपण्याचा संदेश**

**मोबाईलच्या युगात हरवलेला तो आनंद पुन्हा अनुभवला; परळीत हजारो महिलांची 'भुलई'**




## 'परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण व पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरीची मागणी'

■ परळी वैजनाथ

परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज अधिक पारदर्शक व्हावे तसेच नागरिकांना नगरपरिषदेतील निर्णयप्रक्रियेची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण सुरू करावे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे परळी शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी परळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. यासोबतच नगरपरिषदेच्या सभागृहात पत्रकारांना सभेचे कामकाज व्यवस्थितपणे पाहता व वृत्तांकन करता यावे, यासाठी स्वतंत्र पत्रकार गॅलरीची व्यवस्था करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

परळी शहराच्या विकासाच्या दृष्टीने नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा अत्यंत महत्त्वाच्या असतात. या सभांमध्ये शहरातील विकासकामे, नागरिकांच्या समस्या, विविध योजनांची अंमलबजावणी, आर्थिक बाबी तसेच इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतले जातात. या निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वसाधारण सभेचे कामकाज नागरिकांना थेट पाहता यावे, यासाठी नगरपरिषदेच्या अधिकृत सोशल मीडिया माध्यमांवर व डिजिटल प्लॅटफॉर्मवर Live Streaming करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी अश्विन मोगरकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

आपल्या नगरपरिषदेने लोकहिताचे घेतलेले निर्णय परळीतील नागरिकांपर्यंत जलद गतीने व पारदर्शक पद्धतीने पोचण्यासाठी सभागृहात पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरी उपलब्ध करण्यात यावी यासाठी सभागृहात पत्रकारांना योग्य प्रकारे बसण्याची व सभेचे कामकाज स्पष्टपणे पाहण्याची व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यामुळे सभागृहात पत्रकारांसाठी स्वतंत्र, सुयोग्य व कायमस्वरूपी पत्रकार गॅलरी तयार करण्यात यावी. पत्रकारांना वृत्तांकनासाठी आवश्यक असलेली बैठक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी. यामुळे सभेतील चर्चेचे अचूक व वस्तुनिष्ठ वृत्तांकन नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असेही निवेदनात अश्विन मोगरकर यांनी नमूद केले आहे.

आपल्या जिल्ह्यातील बीड, अंबाजोगाई सह अनेक नगरपरिषदा तसेच महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिका, नगरपरिषद आपल्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण आता करत आहेत. नगरपरिषदेच्या कामकाजात पारदर्शकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण झाल्यास नागरिकांना आपल्या शहराशी संबंधित विषयांवर लोकप्रतिनिधी व प्रशासनामध्ये होणारी चर्चा थेट पाहता येईल. त्यामुळे नागरिकांचा नगरपरिषदेच्या कामकाजातील सहभाग वाढण्यास मदत होईल, असा विश्वास मोगरकर यांनी व्यक्त केला.

नगरपरिषदेने या मागण्यांची सकारात्मक दखल घेऊन सर्वसाधारण सभांचे थेट प्रक्षेपण आणि पत्रकारांसाठी स्वतंत्र गॅलरी या दोन्ही बाबींवर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

## १२ कोटी भाविकांच्या स्वागताची तयारी, सिंहस्थासाठी ३५ हजार कोटींची विकासकामे

■ नाशिक वृत्तसंस्था

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. या कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज असून, त्यांच्या सोयीसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांपैकी तब्बल ८५ टक्के कामे कायमस्वरूपी, तर केवळ १५ टक्के कामे कुंभमेळ्यापुरती तात्पुरत्या स्वरूपाची असणार आहेत. त्यामुळे कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा पुढील अनेक वर्षे नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

### कुंभाची कामे ८५ टक्के कामे कायमस्वरूपी

कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नागरिकांना सध्या काही अडचणींचा सामना करावा लागत आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एकाचवेळी हाती घेण्यात आलेल्या या विविध कामांमुळे खड्डेमय रस्ते, नाशिक व त्र्यंबकेश्वरमधील खोदकामे, त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयाचे स्थलांतर आदी विविध कारणांवरून सामान्य नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येतआहे. या पार्श्वभूमीवर, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी या कामांमुळे नागरिकांना सध्या त्रास सहन करावा लागत असल्याचे मान्य करीत ही कामे कुंभमेळ्यापुरतीच मर्यादित न राहता ती नाशिक जिल्ह्याच्या पुढील दीड ते दोन दशकांच्या विकासाचा पाया ठरणार असल्याचे नमूद केले.

### सिंहस्थासाठी ३५ हजार कोटींची विकासकामे

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणामार्फत २२ हजार ४२५ कोटी ३९ लाख रुपयांची कामे केली जात आहेत. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकास, महापारेषण आणि जिल्हा परिषद यांच्या विविध प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या माध्यमातूनही ८ हजार ७६१ कोटी ५४ लाख रुपयांची कामे केली जात आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे, महापालिका आणि एमएसआयडीसीच्या माध्यमातून रस्ते, वाहतूक, रेल्वे, पाणी, आरोग्य आणि इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रकल्प राबवले जात आहेत.

### कुंभमेळ्यानंतरही सुविधांचा फायदाच होणार

धार्मिक परंपरा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधांचा समन्वय साधून नाशिक-त्र्यंबकेश्वरला देशाची प्रमुख आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे, असे कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. कुंभमेळ्यानंतरही या सुविधा नागरिक आणि पर्यटकांसाठी उपयोगी ठरतील, असा दावा कुंभमेळा प्राधिकरणाकडून करण्यात आला आहे.



# वाळू वाहतुकीसाठी ७० हजारांची लाच घेताना तलाठी रंगेहाथ

## गेवराई तालुक्यातील खामगाव सज्जातील तलाठी विलास मोराळे यांच्यावर एसीबीची कारवाई; महसूल यंत्रणेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

**बीड : प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध वाळू उपशाचा मुद्दा गाजत असतानाच अवैध वाळू वाहतुकीसाठी सहकार्य करण्याच्या मोबदल्यात ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना गेवराई तालुक्यातील तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

विलास राजेंद्र मोराळे असे कारवाई झालेल्या तलाठ्याचे नाव असून ते गेवराई तालुक्यातील खामगाव सज्जा येथे कार्यरत होते.

अवैध वाळू वाहतुकीसाठी सहकार्य करण्याच्या बदल्यात मोराळे यांनी संबंधित व्यक्तीकडे लाचेची मागणी केल्याची माहिती समोर आली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. यावेळी ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना मोराळे यांना पथकाने ताब्यात घेतले.

ही कारवाई छत्रपती संभाजीनगर पथकातील भास्कर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मोराळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, गेवराई तालुक्यातील अवैध वाळू उपशाचा मुद्दा यापूर्वीही चर्चेत आला आहे. घरकुल लाभार्थ्यांसाठीच्या वाळूसह अवैध वाळू उपशाच्या प्रकरणांमध्ये महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. चकलांबा पोलिस ठाण्यात अवैध वाळू उपशाप्रकरणी १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झालेला असतानाच आता अवैध वाळू वाहतुकीला सहकार्य करण्यासाठी तलाठ्याने लाच स्वीकारल्याचे समोर आले आहे.

या कारवाईमुळे महसूल यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले असून बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अवैध वाळू उपशाच्या प्रकरणामुळे तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावरही कारवाईची टांगती तलवार असल्याची चर्चा असतानाच तलाठ्यावर झालेल्या या कारवाईने प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळाले आहे.

# किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ; अंकुशराव बोबडे यांची पुनर्नियुक्ती, राजेश मोरे प्रदेश सदस्यपदी नियुक्ती







**जालना : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा, महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी अंकुशराव बोबडे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राजेश मोरे यांची महाराष्ट्र प्रदेश सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपच्या संघटनात्मक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या या नियुक्त्यांमुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, अंकुशराव बोबडे आणि राजेश मोरे हे पक्षाच्या संघटनात्मक कार्यात सक्रिय असून, शेतकरी व सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांसाठी काम करण्याची भूमिका त्यांनी यापूर्वीही मांडली आहे.

ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, अंकुशराव बोबडे आणि राजेश मोरे हे भाजप नेते तथा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे कट्टर समर्थक म्हणून परिचित आहेत. पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना शासनदरबारी प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने त्यांच्या नव्या जबाबदाऱ्या महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

कृषी क्षेत्रातील अडचणी, शेतमालाला योग्य भाव, पीकविमा, सिंचन, शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच ग्रामीण भागात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे या विषयांवर आगामी काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, राजेश मोरे यांच्या महाराष्ट्र प्रदेश सदस्यपदी झालेल्या नियुक्तीचेही भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून स्वागत करण्यात येत आहे. नव्या जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून पक्षाची विचारधारा आणि संघटनात्मक कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी तिन्ही पदाधिकाऱ्यांकडून प्रभावी काम केले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या नियुक्त्यांबद्दल भाजपा कार्यकर्त्यांकडून ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, अंकुशराव बोबडे आणि राजेश मोरे यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त रामबाग शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**वडवणी प्रतिनिधी**

आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक रामबाग शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. युवा उद्योजक गोरख बागडे, संजय बोत्रे व सागर म्हेत्रे यांच्या वतीने हा उपक्रम सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली, तर पत्रकार प्रकाश काशिद, दादासाहेब वखरे व बालासाहेब कांचगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा उद्योजक सागर म्हेत्रे यांनी केले. यावेळी गणेश म्हेत्रे व पत्रकार प्रकाश काशिद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात बंडूजी खांडेकर म्हणाले की, वाढदिवसानिमित्त अनावश्यक हार-तुरे व सत्कारावर खर्च न करता तोच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी खर्च करणे हा अत्यंत कौतुकास्पद उपक्रम आहे. वडवणीतील तरुणांनी सामाजिक बांधिलकी जपत डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा वाढदिवस अशा विधायक उपक्रमातून साजरा केला, ही निश्चितच प्रेरणादायी बाब आहे. भविष्यात रामबाग शाळेच्या विकासासाठी डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असेही ते म्हणाले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. कार्यक्रमास नगरसेवक नागेश डिगे, विठ्ठलराव भुजबळ, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश टकले, गणेशराव म्हेत्रे, पत्रकार शंकर झाडे, अजय राऊत, भैया पंधारे, परमेश्वर भुजबळ, महादेव भुजबळ, सदस्य पुजा टिपरे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती तिडके मॅडम, लतिफे सर, आळणे सर, घुगे सर, केकाण मॅडम, केदार मॅडम, यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.




# नवनाथ वाघमारे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची वडवणी तालुका सकल मराठा समाजाची मागणी

## पोलीस स्टेशनला निवेदन ; गुन्हा दाखल करण्याची ग्वाही

**वडवणी प्रतिनिधी**

ओबीसीचे नेते नवनाथ वाघमारे यांनी मराठा समाजाच्या मुलीबद्दल अपशब्द वापरून सामाजिक तेढ निर्माण केला आहे. या वक्तव्याबद्दल मराठा समाजाकडून तीव्र संताप व्यक्त केला जात असून सर्वस्तरातून निषेध व्यक्त केला जात आहे. तर नवनाथ वाघमारे यांच्यावर प्रतिबंधक गुन्हा दाखल करण्याची मागणी वडवणी तालुका सकल समाजाच्या वतीने पोलीस स्टेशनला निवेदन देऊन केली आहे. दोन दिवसांपूर्वी ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी मराठा समाजातील मुलींबद्दल




अपशब्द वापरून दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केले आहे. या वक्तव्याच्या मराठा समाजामधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या निषेधार्थ आज वडवणी तालुका सकल मराठा समाजाने एकत्र येत पोलीस स्टेशनला रीतसर लेखी निवेदन देऊन अपशब्द वापरणाऱ्या नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा. अशी मागणी करण्यात आली तर पोलीस प्रशासनाने देखील दुपारी दोनच्या नंतर प्रतिबंधक गुन्हा दाखल करण्यात येईल. अशी ग्वाही दिली आहे. तर गुन्हा दाखल न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देखील मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी वडवणी तालुका सकल सकल समाजातील राजकीय, सामाजिक, तरुण, व्यापारी वर्गासह अनेक जण मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे "भव्य अखंड हरिनाम सप्ताह"

## किसन बाबा यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित सप्ताहास उपस्थित रहा : शांतीब्रह्म नवनाथ बाबा

**बीड ( प्रतिनिधी)**

विसाव्या शतकातील महान संत ह.भ.प. वै. सदगुरू किसन बाबा महाराज यांच्या 28 व्या पुण्यतिथी निमित्त ह.भ.प. गुरुवर्य शांतिब्रह्म श्री नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह आयोजन दि. 21 ऑगस्ट 2026 रोजी शुक्रवारी करण्यात आलेले आहे

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा आरंभ दि.21 ऑगस्ट 2026 रोजी संत महंतांच्या उपस्थितीमध्ये दीपप्रज्वलन, ग्रंथ पूजन, टाळ, मृदुंग, विना, पूजन, गुरुपूजन करून तसेच पुष्प वृष्टी करून अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे . श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा पारायण, प्रवचन, हरिपाठ, भावार्थरामायण ,हरी किर्तन, संगीत भजन व हरिजागर असे संपूर्ण सात दिवस भाविक भक्तांना हरी नामाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे

दररोज रात्री हरी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.यामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आपली किर्तन सेवा देणार आहेत.दि. 21 ऑगस्ट शुक्रवार रोजी ह. भ.प. नाना महाराज कदम बंकट स्वामी संस्थान नेकनुर, दि.22 ऑगस्ट शनिवार रोजी ह.भ.प.शिवानंद महाराज शास्त्री पैठण दि. 23 ऑगस्ट रविवार रोजी विद्यावाचस्पती ह.भ.प. डॉक्टर रवी दास जी महाराज शिरसाट ( आळंदी देवाची) दि.24 ऑगस्ट रोजी सोमवारी ह.भ.प. भगीरथ महाराज काळे नाशिक दि.25 ऑगस्ट रोजी ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई अंकित मुक्ताईनगर दि. 26 ऑगस्ट बुधवार रोजी ह.भ.प. कबीर महाराज अत्तर सातारा दि. 27 ऑगस्ट 2026 रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन सायंकाळी नऊ ते अकरा या वेळेत संपन्न होईल तसेच दि. 28 ऑगस्ट शुक्रवार रोजी ह.भ.प. संजय जी महाराज पाचपोर रामायणचार्य बुलढाणा विदर्भ यांचे 12 ते 2 या वेळेस काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा





### भोजनाची व राहण्याची व्यवस्था

- श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सप्ताह दरम्यान 24 तास भोजनाची भाविक भक्ताना राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे

### भव्य दिव्य वॉटरप्रूफ सभा मंडप

- श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भव्यदिव्य असा वॉटरप्रूफ सभामंडप एक एकर पेक्षा मोठ्या जागेमध्ये उभा करण्यात आलेला आहे या ठिकाणी सर्व कार्यक्रम होणार आहेत

कार्यक्रम होईल अशा पद्धतीने श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी या ठिकाणी भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी पूर्ण जिल्हे भरातील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन ह.भ.प. शांती ब्रह्मा गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांनी केले आहे

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# डॉक्टरांवर प्राणघातक हल्ला करणारे आरोपी अजुनही मोकाटच, प्रशासनाच्या निष्क्रीयतेविरोधात जनक्षोभ

## आरोपींच्या अटकेसाठी जनआंदोलन समितीचा सोमवारपासून बेमुदत आंदोलनाचा इशारा!





**महागाव | प्रतिनिधी**

ग्रामीण रुग्णालयात रात्रीच्या वेळी कर्तव्य बजावणाऱ्या वैद्यकीय अधिकारी डॉ. दिक्षा किशोर मुजमुले, परिचारिका पूनम नामदेव कोकरे आणि वॉर्ड बॉय अर्जुन राठोड यांच्यावर अमानुष व प्राणघातक हल्ला अत्यंत संतापजनक आहे. घटनेला तब्बल ७२ तास उलटूनही आरोपी मोकाट फिरत असल्याने संपूर्ण तालुक्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर घटनेच्या निषेधार्थ `जन आंदोलन आधार संघर्ष समिती` आक्रमक झाली असून, आरोपींना रविवारीपर्यंत अटक न झाल्यास सोमवारपासून बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा संस्थापक अध्यक्ष जगदीश भाऊ नरवाडे यांनी दिला आहे.

महागाव येथील ग्रामीण रुग्णालयात रात्रीच्यावेळी रुग्ण व त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या दहा ते बारा साथीदारांनी धुडगूस घालुन तोडफोड करत डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना घडली असुन तीन दिवस उलटूनही अद्याप आरोपी मोकाट असुन एकही आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये भीती व अस्वस्थतेचे वातावरण आहे. पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर चालवून आरोपींच्या मुसक्या आवळाव्यात

रविवारपर्यंत सर्व आरोपींना गजाआड केले नाही, तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला पूर्णपणे पोलीस प्रशासन जबाबदार राहील. जनतेच्या सुरक्षेसाठी आणि न्यायासाठी सोमवारपासून जन आंदोलन आधार संघर्ष समिती रस्त्यावर उतरून बेमुदत आंदोलन करेल, असा स्पष्ट इशारा नरवाडे यांनी दिला आहे.

### घडलेली घटना प्रशासनाच्या अब्रूचे धिंडवडे काढणारी.

**"रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉक्टरांना आपला जीव वाचवण्यासाठी टॉयलेट-बाथरूममध्ये लपावे लागते ७२तास उलटून गेले आरोपी खुलेआम फिरत आहे ही पोलीस प्रशासनासाठी अत्यंत लाजीरवाणी बाब असुन प्रशासनाच्या अब्रूचे धिंडवडे काढणारी आहे.जर शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांवरच असे हल्ले होत असतील, तर तालुक्यातील सामान्य जनतेच्या सुरक्षेचे काय?" एरव्ही गुन्हेगारांना काही तासात पकडल्याच्या वल्गना करणाऱ्या पोलिसांच्या कार्यशैलीवर सुद्धा या हल्ल्यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.त्यामुळे दोन दिवसात आरोपींच्या मुसक्या आवळल्या नाही तर जन हितासाठी बेमुदत आंदोलन करू**

.- **जगदीश नरवाडे** (संस्थापक अध्यक्ष जन आंदोलन आधार संघर्ष समिती)




# शेतकऱ्याच्या कांद्याला भाव मिळाला, तर एवढा त्रास का?

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

महागाई हा आजच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. सोन्याचे भाव वाढले, कपड्यांचे भाव वाढले, साखरेचे भाव वाढले, पेट्रोल-डिझेलचे भाव वाढले, घरांच्या किमती वाढल्या—या प्रत्येक वाढीमागे बाजारपेठेची परिस्थिती, उत्पादनखर्च आणि मागणी-पुरवठ्याचे गणित असते. आपणही ते स्वीकारतो. पण जेव्हा शेतकऱ्याच्या शेतात पिकलेल्या कांद्याला चांगला भाव मिळतो, तेव्हा मात्र सोशल मीडियावर चर्चा, टीका आणि उपहासाचा सूर का उमटतो?

सोन्याचा भाव वाढला, तर सोनाराला कोणी दोष देत नाही. कपड्यांचे भाव वाढले, तर दुकानदाराच्या नफ्यावर कोणी प्रश्नचिन्ह उभे करत नाही. साखरेचे दर वाढले, तर कारखानदाराच्या उत्पादनखर्चाचा विचार केला जातो. पेट्रोल-डिझेल महागले, तर आपण परिस्थितीचा स्वीकार करतो. मग शेतकऱ्याच्या कांद्याला दोन पैसे जास्त मिळाले, तर त्याच्याकडे संशयाने का पाहिले जाते?शेतकरी कांदा बाजारात आणतो, तेव्हा त्यामागे केवळ एक पोते कांदा नसतो. त्या पोत्यात त्याचा घाम असतो, उन्हात काळवंडलेलं शरीर असतं, पहाटेपासून रात्रीपर्यंत केलेली मेहनत असते आणि त्याच्या कुटुंबाच्या उद्याची आशा असते.

कांदा पिकवणे म्हणजे केवळ बी पेरणे आणि पीक काढणे नव्हे. त्यासाठी जमीन तयार करावी लागते, बियाणे घ्यावे लागते, खतांचा खर्च करावा लागतो, औषधांचा खर्च करावा लागतो, पाण्याची व्यवस्था करावी लागते, मजुरी द्यावी लागते. त्यानंतरही निसर्गाची साथ मिळेलच याची शाश्वती नसते. कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, कधी रोगराई, तर कधी बाजारभावाची पडझड—शेतकऱ्याच्या वाट्याला संकटांची कमतरता नसते.विशेष म्हणजे कांद्याच्या भावाची हीच कहाणी वर्षानुवर्षे आपण पाहत आलो आहोत. भाव पडला की शेतकरी रस्त्यावर येतो, कांदा मातीमोल भावाने विकतो किंवा कधी उत्पादनाचा खर्चही भरून निघत नाही. त्या वेळी मात्र त्याच्या नुकसानीची चर्चा फारशी होत नाही. पण एखाद्या हंगामात मागणी वाढली आणि कांद्याला चांगला भाव मिळाला, की लगेच शेतकऱ्याच्या नावाने सोशल मीडियावर स्टेटसचा पूर येतो.हा विरोधाभास नाही का?

शेतकऱ्याने कष्ट करून पिकवलेल्या मालाला भाव मिळणे म्हणजे ग्राहकांची फसवणूक नव्हे. तो शेतकऱ्याच्या श्रमाचा मोबदला आहे. ज्या समाजात प्रत्येकाला आपल्या व्यवसायातून योग्य मोबदला मिळावा असे वाटते, त्या समाजाने शेतकऱ्यालाही त्याच अधिकाराने पाहिले पाहिजे. शेतकऱ्याचा कांदा महाग झाला म्हणून त्याच्यावर राग काढण्यापेक्षा आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा—"हा कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या आयुष्यात किती वेळा असा चांगला भाव मिळतो?"कारण कांद्याचा भाव वाढला म्हणून शेतकऱ्याच्या घरात सोन्याचे दिवस येत नाहीत. त्याच्यावर कर्ज असते, उत्पादनाचा खर्च असतो, पुढच्या हंगामाची चिंता असते आणि निसर्गाच्या अनिश्चिततेशी सतत सुरू असलेली झुंज असते.शेतकरी हा महागाईचा निर्माता नाही; तो अन्नदाता आहे.शेतकऱ्याच्या पिकाला चांगला भाव मिळाला की आपण त्याला दोष देण्याऐवजी त्याच्या कष्टाचा सन्मान करायला हवा. ग्राहक म्हणून आपल्यालाही योग्य भावात वस्तू मिळावी, ही अपेक्षा स्वाभाविक आहे; पण त्याच वेळी उत्पादकाला त्याच्या कष्टाची योग्य किंमत मिळावी, हीदेखील तितकीच न्याय्य अपेक्षा आहे. महागाईची झळ सर्वांनाच बसते; पण शेतकऱ्याच्या आयुष्यातील वर्षानुवर्षांची तोट्याची झळ आपण विसरू नये.सोनं महागलं म्हणून सोनार दोषी नाही, कपडे महागले म्हणून दुकानदार दोषी नाही, साखर महागली म्हणून कारखानदार दोषी नाही, पेट्रोल-डिझेल महागलं म्हणून पंपचालक दोषी नाही—मग कांद्याला चांगला भाव मिळाला म्हणून शेतकरी दोषी कसा?कांद्याच्या प्रत्येक थरात शेतकऱ्याच्या कष्टाची एक कहाणी दडलेली आहे. तो कांदा आपल्या स्वयंपाकघरात पोहोचण्यापूर्वी त्याने शेतकऱ्याच्या हातातून बाजारापर्यंतचा लांब प्रवास केलेला असतो. म्हणून पुढच्या वेळी कांद्याचा भाव वाढल्याचे दिसले, तेव्हा केवळ मोबाईल उघडून स्टेटस ठेवण्याआधी एकदा त्या शेतकऱ्याच्या हातांकडे पाहा—त्या हातांवरची माती, तळहातावरच्या घट्ट झालेल्या रेषा आणि कपाळावरचा घाम आपल्याला एकच गोष्ट सांगेल—"भाव वाढलेला नाही, माझ्या कष्टाला कधीतरी किंमत मिळाली आहे."

शेतकऱ्याच्या कष्टाला भाव मिळणे ही चेष्टेची गोष्ट नाही;तो त्याच्या श्रमाचा सन्मान आहे.आणि अन्नदात्याच्या कष्टाचा सन्मान करणे,ही केवळ जबाबदारी नाही—तर माणुसकी आहे.

# परळीत बुधवारी संस्कृत श्लोक गायन व भाषण स्पर्धा

**परळी वैजनाथ** | सर्व भाषांची जननी व समग्र ज्ञान-विज्ञानाचे अधिष्ठान असलेल्या "संस्कृत" या प्राचीन भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने परळी शहरात येत्या बुधवारी (दि.२६ ऑगस्ट) रोजी व्यापक स्वरूपात "संस्कृत श्लोकगायन व भाषण स्पर्धांचे" आयोजन करण्यात आले आहे.

येथील आर्य समाजाच्या सभागृहात दि.२६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा. पर्यंत शिशुगट, बालगट व महाविद्यालयीन गटांच्या स्पर्धा होतील, तर दुपारी २.०० ते ५.०० वाजेपर्यंत प्राथमिक व माध्यमिक गटातील स्पर्धा पार पडतील. स्पर्धेची परिपत्रके सर्व शाळा - महाविद्यालयांना पाठविण्यात आली आहेत.

या स्पर्धेकरिता शिशुगट (बालवाडी), बालगट (पहिली ते चौथी), प्राथमिक (पाचवी ते सातवी), माध्यमिक (आठवी ते दहावी) व महाविद्यालयीन (अकरावी ते पदवी अंत्य) असे पाच स्तर करण्यात आले आहेत. या प्रत्येक स्तराच्या स्पर्धेसाठी वेगवेगळी सुभाषिते व भाषणाकरिता वेगवेगळे विषय निश्चित करण्यात आले आहेत. सर्व स्तरांमधून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र पारितोषिके देण्यात येणार आहेत. पुरस्कारांचे वितरण नारळी पौर्णिमेदिनी होणाऱ्या सामूहिक संस्कृत दिन समारंभात पाहुण्याच्या हस्ते होणार आहे.

तरी इच्छुकांनी अधिक माहितीसाठी व स्पर्धांची परिपत्रके मिळवण्याकरिता स्पर्धेचे संयोजक प्रा. डॉ. अरुण चव्हाण (९८९०३५५३४९) यांच्याशी व शाळा महाविद्यालयाच्या संस्कृत शिक्षक - प्राध्यापकांशी संपर्क करावा, असे आवाहन सामूहिक संस्कृत दिन समारोह समितीचे अध्यक्ष श्री जुगलकिशोर लोहिया, संयोजक उग्रसैन राठौर, सहसंयोजक जयपाल लाहोटी, प्रशांतकुमार शास्त्री आदींनी केले आहे.

# तालुका स्तरीय विज्ञान मेळाव्यात मातोश्री विद्यालय महागाव अव्वल




**महागाव | प्रतिनिधी**

तालुका विज्ञान मेळाव्यात मातोश्री विद्यालय अवलस्थानी. समग्र शिक्षा अभियान पंचायत समिती महागाव व जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विज्ञान मेळावा महागाव येथे जिल्हा परिषद हायस्कूल येथे दिनांक 21 /8 /2026 ला आयोजित केला होता या विज्ञान मिळाव्यात भारतीय ऊर्जा क्षेत्र- 2047 :संधी आणि आव्हाने या विषयावर कुमारी प्राची शिंदे या विद्यार्थिनींनी तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला व मातोश्री विद्यालयाची चमक सिद्ध केली प्राचीचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या तर प्राचार्य व समस्त कर्मचारी वृंद शुभेच्छा दिल्या तिचे सर्वत्र कौतुक होत असून परिसरात विज्ञान विषयाचा मानाचा तो उंचावलाआहे

# सिंधी काळेगावच्या विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी

**जालना** | तालुक्यातील सिंधी काळेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आता शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून सामाजिक कार्यकर्ते गणेश गिराम, शकिल सय्यद आणि गणेश लक्ष्मण गिराम यांनी सामाजिक बांधिलकी जपत शाळेला सुमारे २० हजार रुपये किमतीचा आरओ वॉटर फिल्टर भेट दिला. तसेच शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी उपलब्ध असलेल्या शिल्लक निधीतूनही आरओ बसविण्यासाठी सहकार्य करण्यात आले.

सिंधी काळेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग असून परिसरातील अनेक विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. विद्यार्थ्यांना दररोज स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळणे आवश्यक आहे. पाण्याच्या गुणवत्तेचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होत असल्याने शाळेसाठी आरओ फिल्टर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेत फिल्टर केलेले शुद्ध पाणी उपलब्ध होणार आहे. केवळ आर्थिक मदत न करता शाळेतील विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष गरज ओळखून उपयोगी उपक्रम राबविण्यात आला आहे. आरओ फिल्टर बसविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटणार असून, या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले. आरओ वॉटर फिल्टरचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शांताबाई गिराम यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गणेश गिराम, माजी सरपंच सुभाष गिराम, मुख्याध्यापक बबन बोरुडे, विष्णुपंत गिराम, तुळशिराम गिराम, गजानन गिराम, परसराम गिराम, सय्यद शकिल, वसंत जोगदंड, शिवाजी जोगदंड, गणेश उत्तमराव गिराम, अंबादास गिराम, गजानन नारायण गिराम, समीर सय्यद, वामन गिराम, सय्यद शौकत, शिवाजी गिराम, खतीब सय्यद, बाबासाहेब गिराम आदी उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शनिवार, 22 ऑगस्ट 2026
Last page

# ना.पंकजाताई मुंडेंच्या आश्वासनानंतर जालन्यात बंजारा समाज बांधवांनी आमरण उपोषण घेतले मागे

## मुख्यमंत्र्यांसोबत बैठक लावण्याचे आश्वासन

जालना | बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती अर्थात एसटी प्रवर्गात समावेश करून आदिवासी समाजाला मिळणाऱ्या सर्व शासकीय सवलती लागू कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण अखेर स्थगित करण्यात आले. पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपोषणकर्ते एकनाथ चव्हाण यांच्याशी फोनद्वारे संवाद साधून मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर चव्हाण यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. बंजारा समाज बांधव आणि उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांच्या हस्ते पाणी घेऊन एकनाथ चव्हाण यांनी आपले आमरण उपोषण सोडले. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाज बांधव आणि आंदोलक उपस्थित होते. बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा, तसेच आदिवासी समाजाला लागू असलेल्या सर्व शासकीय सवलती बंजारा समाजालाही लागू कराव्यात, या मागणीसाठी एकनाथ चव्हाण यांनी आमरण उपोषण सुरू केले होते.



### ना. पंकजाताईंचा उपोषणकर्त्यांशी संवाद

**पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज उपोषणकर्ते एकनाथ चव्हाण यांच्याशी फोनवरून संवाद साधला. सोमवारनंतर मुख्यमंत्री यांची वेळ घेऊन बंजारा समाजाच्या मागण्यांवर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे चव्हाण यांनी सांगितले. या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.उपोषण स्थगित केल्यानंतर बोलताना एकनाथ चव्हाण यांनी सांगितले की, पंकजाताई मुंडे यांच्या शब्दांचा आम्ही आदर करीत असून, त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आमरण उपोषण स्थगित करीत आहोत. यावेळी बंजारा समाजाचे अविनाश चव्हाण, उद्धव पवार, प्रकाश चव्हाण, आंदोलक संदेश चव्हाण यांच्यासह हजारो बंजारा समाज बांधव आणि आंदोलक उपस्थित होते.**

# ‘सद्गुरू श्री साहेबराव आवारे साहित्य पुरस्कार-२०२६’साठी मुदतवाढ

**अहिल्यानगर :** अक्षर साहित्य प्रतिष्ठान, अहिल्यानगर यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या ‘सद्गुरू श्री साहेबराव आवारे साहित्य पुरस्कार-२०२६’ साठी पुस्तक पाठविण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष सिद्धिनाथ मेटे महाराज यांनी केले आहे.

साहित्यिकांना आता 30 ऑक्टोबर २०२६ पर्यंत पुरस्कारासाठी पुस्तके पाठविता येतील.



या पुरस्कारासाठी कादंबरी, काव्यसंग्रह तसेच कथासंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक लेखन, नाटक, बालसाहित्य, संशोधन आदी इतर साहित्य प्रकारांतील पुस्तके स्वीकारण्यात येणार आहेत. कादंबरी, काव्य आणि इतर प्रत्येक अशा तीन साहित्यकृतीस पुरस्कार देण्यात येतील. हें साहित्य दोन प्रती पाठविणे आवश्यक आहे.

सन्मानचिन्ह व प्रत्येकी रोख ५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कारासाठी इच्छुक साहित्यिकांनी आपली पुस्तके समन्वयक सार्थक वाळके पाटील, न्यू तिरंगा प्रिंटर्स, शॉप नं. १, छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल, तानवडे लॅबजवळ, बागरोजा हडको, दिल्लीगेट रोड, नालेगाव, अहिल्यानगर – ४१४००१ या पत्त्यावर पाठवावीत.पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता जेऊर (बायजाबाई), ता. जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. मागील वर्षी प्रा. बाळासाहेब लबडे, रायगड, नाशिकचे कवी सागर जोपूळकर, शारदा घोडके अहिल्यानगर, सांगोल्याचे हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

अधिकाधिक साहित्यिकांनी या पुरस्कारासाठी आपल्या साहित्यकृती पाठवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# तेली समाजाचा रविवारी राज्यस्तरीय मेळावा कोल्हापुरात

## बीड जिल्ह्यातील तेली समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके

**परळी वैजनाथ |** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा आयोजित तेली समाजाचा राज्यस्तरीय मेळावा रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी कोल्हापूर येथील नष्टे लॉन, न्यू शाहूपुरी येथे दुपारी १२ ते ५ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यास राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री विजय वडेट्टीवार, माजी खासदार रामदास तडस आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती महासभेचे बीड जिल्हाध्यक्ष संगमेश्वर



फुटके यांनी दिली आहे. या मेळाव्यास बीड जिल्ह्यातील तेली समाज बांधवांनी व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे, तालुकाध्यक्ष मनोज जठार यांनी केले आहे. या मेळाव्यात संत जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळास स्वतंत्र दर्जा द्यावा, सोलापूर-मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक उभारावे, मुंबई येथे समाज भवनासाठी जागा मंजूर करावी, पारंपरिक तेल व्यावसायिकांना संरक्षण द्यावे यासह विविध मागण्यांवर चर्चा होणार आहे.

# महाकवी वामनदादा कर्डक जीवन गौरव पुरस्काराने साहित्यिक अजयकुमार गंडले सन्मानित

**परभणी :** अभिरा फाउंडेशन, परभणी (महाराष्ट्र) यांच्या वतीने महाकवी, लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या १०५व्या जयंतीप्रीत्यर्थ प्रदान करण्यात येणारा `महाकवी, लोकशाहीर वामनदादा कर्डक जीवन गौरव पुरस्कार` यंदा प्रख्यात विचारवंत व साहित्यिक अजयकुमार गंडले यांना परभणीचे महापौर सय्यद इक्बाल यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

परभणी येथील बी. रघुनाथ सभागृहात सोमवार (दि. १७ ऑगस्ट) झालेल्या या भव्य सोहळ्याचे उद्घाटन भारतीय दलित पँथरचे मराठवाडा कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परभणीचे महापौर सय्यद इकबाल हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून नागेशदादा सोनपसारे, स्वागताध्यक्ष नगरसेवक मिलिंद बामणीकर, गौतम मुंडे, प्रा. राजेश रणखांबे, यशवंत भैय्या भालेराव, डॉ. रामप्रसाद खंदारे, डॉ. सुनील तुरूकमाने, कीर्तिकुमार बुरांडे, नगरसेवक आकाश लहाने, नगरसेवक अविनाश अवचार, दीपक वारकरी आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अजयकुमार गंडले हे प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे नवराष्ट्र निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. तसेच अनेक कार्यक्रमात त्यांचे व्याख्यान होत असतात. फुले, शाहू, आंबेडकरी चवळीचे मुखपत्र दैनिक सम्राट मध्ये सातत्याने त्यांचे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या विशेषांकात त्यांचा लेख छापण्यात आला होता. ज्याचे प्रकाशन युनोच्या कार्यालयात झाले होते.

त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल ज्येष्ठ पत्रकार ,साहित्यिक,भीमयुगकार रानबा गायकवाड, प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक डॉ.सिद्धार्थ तायडे, परळी विद्युत निर्मिती केंद्राचे माजी सहाय्यक व्यवस्थापक विलास ताटे, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ सावंत, प्रसिद्ध निवेदक व कवी बा.सो. कांबळे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या पुरस्कार सोहळ्यास मराठवाड्यातील अनेक गीतकार, लोकशाहीर, गायक, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत अजयकुमार गंडले यांना सन्मानचिन्ह, मानपत्र व पुष्पहार प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन अभिरा फाउंडेशनचे मार्गदर्शक भदंत मुदितानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आयोजनासाठी अध्यक्ष संदीप कांबळे, भगवान वाघमारे, शिवाजी सुगंधे, पद्माकर वायफळ, शेषराव जलारे, प्रकाश सपाटे, आकाश इंगोले, सुनील लहाने, शुभम अवचार तसेच फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भदंत मुदितानंद थेरो यांनी केले, तर प्रभावी सूत्रसंचालन संजय बगाटे यांनी केले.

